मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 11 ऑगस्ट 2026 | पान- 1

# मोशी कचरा डेपो दुर्घटना : नगरसेविका सारिका गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

## कंपनीकडून 40 लाख पालिकेकडून 10 लाख तर राज्य शासनाकडून 5 लाखाची अशी एकूण 55 लाखाची मदत, नोकरी अन् शिक्षणाची जबाबदारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपो परिसरातील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा मोठा ढिगारा कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. या दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू, तर १४ जण जखमी झाले होते. बचाव पथकांनी तब्बल ८४ तास अथक प्रयत्न करून शोधकार्य राबवले होते. या संकटसमयी कुटुंबातील कर्ता पुरुष गमावलेल्या बाधितांना न्याय मिळवून देण्यासाठी नगरसेविका सारिका गायकवाड यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. यामुळे कंपनीकडून ४० लाख पालिकेकडून १० लाख तर राज्य शासनाकडून ५ लाखाची अशी एकूण ५५ लाखाची मदत प्रत्येक कुटुंबाला जाहीर झाली असून नोकरी अन् मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली गेली आहे.



या दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, केवळ एकर कमी आर्थिक मदतीने बाधित कुटुंबांचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि भविष्यातील सुरक्षिततेचा प्रश्न सुटणार नाही, ही बाब लक्षात घेऊन सारिका गायकवाड यांनी दीर्घकालीन पुनर्वसनाची मागणी लावून धरली होती. भाजपा नेते तथा आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या या पाठपुराव्यामुळे अखेर कंपनी प्रशासनाला ठोस निर्णय घेणे भाग पडले.

संबंधित कंपनीकडून आता प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना ४० लाख रुपयांची भरीव आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय मृत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी, कुटुंबातील एका पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही कंपनीने घेतला आहे. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, 'क' क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, नगरसेविका सारिका गायकवाड, रवींद्र गायकवाड, सचिन तापकीर, कंपनीचे एचआर प्रतिनिधी व मृत कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

> “मोशी दुर्घटनेत कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावलेल्या कुटुंबीयांच्या वेदना शब्दांत मांडता येणार नाहीत. त्यामुळे केवळ आर्थिक मदत देऊन आमची जबाबदारी संपत नाही, तर या कुटुंबांच्या भवितव्याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना ४० लाख रुपयांची मदत, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी, पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विम्याचे संरक्षण मिळावे, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे समाधान आहे. आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढेही या कुटुंबांना आवश्यक ती मदत आणि न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहू.”
>
> **- सारिका गायकवाड, नगरसेविका.**



# रक्षाबंधनासाठी पोस्टाची खास सुविधा; अवघ्या 12 रुपयांत वॉटरप्रूफ कव्हर, देश-विदेशात राखी पाठविणे सोपे

## पिंपरी-चिंचवडमधील प्रमुख टपाल कार्यालयांत विशेष प्लास्टिक कव्हर उपलब्ध; स्पीड पोस्टने राखी सुरक्षित पाठविण्याची सुविधा

**पिंपरी | प्रतिनिधी**

रक्षाबंधन हा भाऊ- बहिणीच्या प्रेम, विश्वास, आणि जिव्हाळयाचा पवित्र सण अधिक आनंददायी करण्यासाठी तसेच परदेशात राहणाऱ्या भावंडांपर्यंतही बहिणीची राखी वेळेत आणि सुरक्षित पोहोचावी यासाठी भारतीय टपाल विभागाने राखी पाठविण्यासाठी वॉटरप्रूफ पाकिट उपलब्ध केले आहे. या सुविधेमुळे राखी खराब न होत्या आपल्या लाडक्या भाऊरायापर्यंत पोहोचू शकेल.




पिंपरी- चिंचवड शहरातील प्रमुख टपाल कार्यालयांमध्ये अवघ्या १२ रुपयांत विशेष प्लास्टिक कव्हर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. स्पीड पोस्टच्या माध्यमातून देश-विदेशात राखी पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे.

पिंपरी, आकुर्डी, निगडी, चिंचवड भोसरी, चिखली, सांगवी आदी टपाल कार्यालयांमध्ये हे विशेष कव्हर विक्रीस ठेवण्यात आले आहे. मजबूत आणि वॉटरप्रूफ असल्यामुळे पोस्टाच्या प्रवासात राखी सुरक्षित राहण्यास मदत होते. त्यामुळे दूरदेशी असेलेल्या भावंडांपर्यंतही बहिणीच्या प्रेमाचा धागा सुरक्षितपणे पोहोचू शकतो. त्यामुळे पोस्टाने ही सेवा सुरु केली आहे.

स्पीड पोस्टच्या सुविधेनुसार राखी पाठविण्यासाठी शुल्क हे पार्सलच्या वजनानुसार आकारले जाते. रक्षाबंधनाच्या काळातील वाढती गर्दी लक्षात घेऊन अनेक टपाल कार्यलयांमध्ये स्वतंत्र बुकिंग काउंटर सुरु करण्यात आले आहे. शिक्षण, नोकरी आणि व्यवसायानिमित्त पिंपरी- चिंचवडमधील अनेकजण विदेशात वास्तव्यास आहेत. राखी वेळेत पोहोचवण्यासाठी नागरिकांनी आगाऊ राखी पोस्ट करावी. जेणेकरून रक्षाबंधनावेळी राखी आपल्या स्वकीयांपर्यंत पोहोचू शकेल.

> भावा-बहिणीच्या अनमोल नात्याच्या सणासाठी अर्थात रक्षाबंधनानिमित्त टपाल विभागाने राखी पाठविण्यासाठी प्लास्टिक कव्हर उपलब्ध करुन दिले आहे. स्पीड पोस्टद्वारे सुरक्षितपणे राखी देश- विदेशात पाठविण्याची सुविधा नागरिकांना मिळणार आहे.
>
> **- समीर महाजन, प्रशासकीय अधिकारी वरिष्ठ डाक, अधिक्षक..**

# म्हेत्रेवस्तीत 4 वर्षांच्या बालिकेवर भटक्या कुत्र्यांचा जीवघेणा हल्ला

## नागरिकांमध्ये तीव्र संताप, पालिका प्रशासनाविरोधात आंदोलनाचा इशारा



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील म्हेत्रेवस्ती परिसरात दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घराबाहेर पडलेल्या चार वर्षांच्या निष्पाप बालिकेवर ७ ते ८ मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांच्या टोळक्याने अचानक जीवघेणा हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे बालिका गंभीर जखमी झाली आहे. सुदैवाने, आजूबाजूच्या नागरिकांच्या ही घटना तात्काळ निदर्शनास आल्याने त्यांनी धाव घेऊन कुत्र्यांना पळवून लावले, ज्यामुळे बालिकेचे प्राण वाचले. गंभीर जखमी झालेल्या या बालिकेवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या भयानक घटनेमुळे संपूर्ण म्हेत्रेवस्ती व चिखली परिसरात भीतीचे सावट पसरले असून, नागरिकांमध्ये महापालिका प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी प्रभागनिहाय विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, प्रभाग क्र. १ मधील नियुक्त अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आणि ढिसाळ नियोजनामुळेच ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

नागरिकांच्या करातून वेतन घेणारे अधिकारी कर्तव्यात कसूर करत असल्यामुळे निष्पाप चिमुकलीला गंभीर त्रासाला सामोरे जावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर, म्हेत्रेवस्ती व चिखली परिसरातील मोकाट व हिंसक कुत्र्यांचा तात्काळ आणि कायमचा बंदोबस्त करण्यात यावा, तसेच पुढील तीन दिवसांत या भागात युद्धपातळीवर भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण (नसबंदी) व रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी केली जात आहे. प्रशासनाने २४ तासांच्या आत ठोस कारवाई केली नाही, तर हेच भटके कुत्रे पकडून महापालिकेच्या मुख्य इमारतीत व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये सोडले जातील आणि तीव्र लोकआंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

> "म्हेत्रेवस्तीत लहान मुलीवर झालेला भटक्या कुत्र्यांचा हल्ला अत्यंत दुर्दैवी आणि प्रशासकीय ढिसाळपणाचा पुरावा आहे. लहान मुलांच्या व नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या मोकाट कुत्र्यांचा कायमचा बंदोबस्त महापालिकेने तात्काळ केला पाहिजे. अन्यथा संतप्त नागरिकांना सोबत घेऊन हेच भटके कुत्रे पकडून महापालिकेच्या मुख्य इमारतीत सोडण्यात येतील."
>
> \- संगीता (नानी) ताम्हाणे,नगरसेविका.

> "प्रभाग क्र. १ मधील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात तेथील नियुक्त अधिकारी अपयशी ठरले आहेत. त्यांच्या या अक्षम्य हलगर्जीपणामुळेच एका चिमुकलीला आज रुग्णालयात वेदना सहन कराव्या लागत आहेत. या निष्काळजी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. चिखली परिसरात आजच्या आज विशेष पथक पाठवून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा व लवकरात लवकर मोहीम राबवावी, अन्यथा आम्ही तीव्र आंदोलन छेडू."
>
> \- यश साने,नगरसेवक.

> भटक्या कुत्र्यांना पकडण्याची कारवाई सुरू केली आहे. या भागातील श्वानांची नसबंदी झाली होती टप्प्याटप्प्याने संपूर्ण भागात पाहणी होईल. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी श्वान निवारा गृहाचा प्रस्ताव मंजुरीच्या टप्प्यात असून, त्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. निवारा गृहाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आणि नियमित नसबंदी व लसीकरणाच्या मोहिमेमुळे भटक्या कुत्र्यांची संख्या व त्यांचा उपद्रव नियंत्रित होण्यास मदत होईल.
>
> \- डॉ. अरुण दगडे ,पशुवैद्यकीय अधिकारी.

# 'बोन डेंसिटी' मोफत चाचणी उपक्रमास मोशीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## लायन्स क्लब ऑफ पिंपरी चिंचवड स्टार आणि इन्स्पिरेशन्स बाय डॉ. प्रेरणा आणि डॉ. गोपाळेज् ऑर्थोपेडिक क्लिनिक यांचा एकत्रित उपक्रम





**पिंपरी | प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ पिंपरी चिंचवड स्टार, इन्स्पिरेशन्स बाय डॉ. प्रेरणा आणि डॉ. गोपाळेज् ऑर्थोपेडिक क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने मोशी प्राधिकरणात आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उस्फूर्त व प्रचंड प्रतिसाद मिळाला.

मोशी प्राधिकरणातील बारकोड बाय रामा ग्रुप कमर्शियल मॉल येथील 'इन्स्पिरेशन्स बाय डॉ. प्रेरणा' येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी सुमारे २५०० रुपये किमतीची 'बोन डेंसिटी' (BMD) चाचणी पूर्णपणे मोफत करण्यात आली. प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अनिकेत गोपाळे यांनी उपस्थित रुग्णांची तपासणी करून त्यांना हाडांच्या आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, डॉ. प्रेरणा गोपाळे यांनी डाएट प्लॅन्स, स्किन ट्रीटमेंट्स आणि बॉडी स्कल्प्टिंग यांसारख्या आधुनिक वैद्यकीय सेवांवर विशेष सवलती देऊन नागरिकांना मार्गदर्शन केले. वाढत्या वयात हाडांची घनता कमी होणे आणि त्यातून उद्भवणाऱ्या आजारांवर वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला.

लायन्स क्लब ऑफ पिंपरी चिंचवड स्टारच्या संस्थापक व मेडिकल हेल्थ चेक-अपच्या डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन लायन प्रीती बोंडे, अध्यक्षा डॉ. प्रज्ञा देवकाते, सचिव लायन वैशाली वाकचौरे आणि खजिनदार लायन भक्ती बारहाते यांच्या विशेष सहकार्यातून व नियोजनातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. 'आपले आरोग्य... आमची जबाबदारी' हा ध्यास उराशी बाळगून आयोजित केलेल्या या सामाजिक उपक्रमाचे स्थानिक रहिवाशांनी अत्यंत कौतुक केले असून, भविष्यातही अशाच प्रकारचे आरोग्यविषयक उपक्रम राबवण्यात येतील, असा विश्वास आयोजकांच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# बेकायदा राडारोड्यावर आळा घालण्यासाठी 10 हजारांचा दंड

## राडारोडा टाकणाऱ्या वाहनांची माहिती देणाऱ्या नागरिकांना 5 हजारांचे बक्षीस; स्थायी समितीत ठराव

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात विनापरवाना राडारोडा टाकण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिकेने कडक कारवाई करावी, अशी मागणी स्थायी समितीत ठरावाद्वारे करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणाऱ्या वाहनमालकाला प्रत्येक खेपेस किमान १० हजार रुपयांचा दंड ठोठावावा, तसेच बेकायदा राडारोडा वाहतूक करणाऱ्या वाहनाची पुराव्यासह माहिती देणाऱ्या नागरिकाला ५ हजार रुपयांचे बक्षीस द्यावे,

अशी शिफारस या ठरावात करण्यात आली आहे. सूरज लोखंडे, गौरव घुले आणि नगरसेविका दीपाली डोख यांनी हा प्रस्ताव दिला असून, तो प्रशासनाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आला आहे. शहराचा विस्तार वेगाने होत असताना अनधिकृत कचरा आणि राडारोडा टाकण्याचे प्रकार वाढत आहेत. रात्रीच्या वेळी मोकळ्या जागा,

रस्त्यांच्या कडेला तसेच सार्वजनिक ठिकाणी बेकायदा राडारोडा टाकला जात असल्याने शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. यामुळे शहराच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याचे ठरावात नमूद करण्यात आले आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी महापालिकेने प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज असून, नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी बक्षीस योजना सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आरोग्य विभागाला बेकायदा राडारोडा टाकणाऱ्या वाहनाची छायाचित्रे, वाहन क्रमांक किंवा अन्य पुराव्यांसह माहिती देणाऱ्या नागरिकाला प्रतिवाहन ५ हजार रुपये बक्षीस देण्यात यावे. या योजनेसाठी महापालिका आयुक्तांनी वर्गीकरणाद्वारे तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात या ठरावात करण्यात आली आहे.




### माहिती देणाऱ्या नागरिकाला पाच हजारांचे बक्षीस

» बेकायदा राडारोडा वाहतूक करणाऱ्या वाहनाची छायाचित्रे, वाहन क्रमांक किंवा अन्य ठोस पुराव्यासह माहिती देणाऱ्या नागरिकाला पाच हजार रुपयांचे बक्षीस देण्याची शिफारस करण्यात आली आहे. नागरिकांचा सहभाग वाढवून राडारोडा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याचा या योजनेमागील उद्देश आहे. आरोग्य विभागाकडे नागरिकांनी पुराव्यासह माहिती सादर करावी, अशी सूचना करण्यात आली आहे. प्रत्येक वाहनामागे पाच हजार रुपये बक्षीस देण्यासाठी महापालिका आयुक्तांनी वर्गीकरणाद्वारे तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ठरावात करण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना स्वच्छता राखण्याच्या मोहिमेत सक्रिय सहभागी करून घेण्याचा प्रयत्न होणार आहे.

### बेकायदा राडारोड्यावर दहा हजारांचा दंड

» पुणे शहरात सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना राडारोडा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थायी समितीत करण्यात आली आहे. प्रत्येक खेपेस राडारोडा टाकणाऱ्या वाहनमालकाला किमान १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्याची शिफारस करण्यात आली आहे. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना मोकळ्या जागा, रस्त्यांच्या कडेला आणि सार्वजनिक ठिकाणी रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात राडारोडा टाकला जात असल्याने स्वच्छतेचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे महापालिकेने प्रभावी यंत्रणा उभारून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रस्तावामुळे बेकायदा राडारोडा वाहतुकीवर नियंत्रण आणण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

### महापालिका प्रशासनाकडे ठराव पाठविला

» सूरज लोखंडे, गौरव घुले आणि नगरसेविका दीपाली डोख यांनी बेकायदा राडारोड्याविरोधात हा प्रस्ताव मांडला असून, तो महापालिका प्रशासनाच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आला आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे राडारोडा टाकण्याच्या प्रकारांमुळे स्वच्छतेसोबतच शहराच्या सौंदर्याला आणि प्रतिमेलाही धक्का बसत आहे. त्यामुळे अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच नागरिकांसाठी बक्षीस योजना सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. महापालिकेने राडारोडा वाहतुकीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारावी आणि दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी भूमिका ठरावात मांडण्यात आली आहे.

---

# पुणे मेट्रो प्रवाशांसाठी मोठी सुविधा; शिवाजीनगरमध्ये दोन मार्गिकांना जोडणारा स्कायवॉक ऑगस्टअखेर तयार

## 5.5 कोटींच्या खर्चातून 150 मीटरचा स्कायवॉक; स्थानकाबाहेर न पडताच मेट्रो बदलता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

शिवाजीनगर येथील कामगार पुतळ्यालगत हिंजवडी-शिवाजीनगर (लाइन ३) आणि स्वारगेट-पिंपरी चिंचवड (लाइन १) या दोन प्रमुख मेट्रोमार्गिकांना जोडणाऱ्या स्कायवॉकचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

१५० मीटर लांबीचा हा स्कायवॉक ऑगस्टअखेर तयार होणार असून, केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या (सीएमआरएस) तपासणीनंतर तो प्रवाशांसाठी खुला केला जाईल. सुमारे ५.५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला हा स्कायवॉक दोन्ही स्थानकांच्या कॉनकर्स क्षेत्राला थेट जोडण्यात येत आहे.



यामुळे प्रवाशांना स्थानकाबाहेर न पडता किंवा रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा सामना न करता सहजपणे मेट्रो बदलता येईल. आयटी पार्कच्या (हिंजवडी) दिशेने जाणारे कर्मचारी तसेच पिंपरी-चिंचवड व स्वारगेटच्या प्रवाशांचा यामुळे वेळ वाचणार आहे.

शिवाजीनगर येथील कामगार पुतळ्यालगत हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिका क्रमांक ३ आणि स्वारगेट-पिंपरी-चिंचवड मेट्रो मार्गिका क्रमांक १ यांना जोडणाऱ्या स्कायवॉकचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सुमारे १५० मीटर लांबीचा हा स्कायवॉक ऑगस्टअखेर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. दोन्ही मेट्रो स्थानकांच्या कॉनकर्स भागांना थेट जोडण्याचे काम या माध्यमातून करण्यात येत आहे. त्यामुळे प्रवाशांना दोन मेट्रो मार्गिकांमध्ये सहजपणे प्रवास करता येणार आहे.

सुमारे ५.५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या या स्कायवॉकचे बांधकाम आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. ऑगस्टअखेर काम पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून (सीएमआरएस) आवश्यक तपासणी केली जाणार आहे. तपासणी आणि सुरक्षा मान्यता मिळाल्यानंतर स्कायवॉक प्रवाशांसाठी खुला केला जाईल.

> "पुणेकरांचा प्रवास सुखकर व गतिमान करण्यासाठी महामेट्रो कटिबद्ध आहे. शिवाजीनगर येथील दोन्ही मेट्रोमार्गिकांना जोडणाऱ्या १५० मीटर लांबीच्या स्कायवॉकचे काम अंतिम टप्प्यात असून, ऑगस्टअखेरपर्यंत तो तयार होईल. ५.५ कोटी रुपये खर्चून उभारलेला हा स्कायवॉक पे-टू-पे क्षेत्राला जोडत असल्याने प्रवाशांना स्थानकातून बाहेर न पडता थेट मेट्रो बदलता येईल. तपासणी आणि लाइन ३ चे स्थानक सुरू होताच हा स्कायवॉक प्रवाशांच्या सेवेत दाखल केला जाईल."
>
> - चंद्रशेखर तांबवेकर, अतिरिक्त महाव्यवस्थापक, महामेट्रो.

# चाकण, तळेगावसह पुणे- नाशिक प्रवास होणार सुसाट!

## 'पीएमआरडीए'कडून चाकण आणि तळेगाव परिसरासाठी पूर्व बाह्यवळण मार्ग प्रस्तावित असून, त्याचाच भाग म्हणून चार रस्ते तयार केले जाणार आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रांतील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पावले उचलली आहेत. यात पुणे-नाशिक महामार्गावर चार पर्यायी बाह्यवळण रस्ते तयार करण्यात येणार आहेत. यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याचबरोबर प्रमुख जिल्हा मार्गांची सुधारणा करण्यात येत असून, हे काम प्रगतिपथावर आहे. यामुळे आगामी काळात औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीचा वेग वाढणार आहे.

'पीएमआरडीए'कडून चाकण आणि तळेगाव परिसरासाठी पूर्व बाह्यवळण मार्ग प्रस्तावित असून, त्याचाच भाग म्हणून चार रस्ते तयार केले जाणार आहेत. त्यासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. तळेगाव-चाकण महामार्गावरील हिंगणे चौक ते चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा तीन येथे खराबवाडीला जोडणारा रस्ता तयार केला जाणार आहे. हा रस्ता ९०० मीटर लांबीचा आणि ३० मीटर रुंद असेल. हिंगणे ते चौक फोक्सवॅगन कंपनीला जोडणारा हा रस्ता असेल. या रस्त्यामुळे तळेगाव, चाकणमधील टप्पा दोन व तीनमधून नाशिक व पुण्याकडे जाणारी वाहतूक पुणे-नाशिक महामार्गाशी जोडली जाईल. त्यातून तळेगाव चौक आणि चाकणमधील वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

नाणेकरवाडीतील सॅनी कंपनी ते समृद्धी सीएनजी पंपाला जोडणारा १.२ किलोमीटर लांबीचा आणि १५ मीटर रुंद रस्ता तयार केला जाणार आहे. हा रस्ता तळेगाव आणि चाकणमधील टप्पा दोन व तीनला पुणे-नाशिक महामार्गाशी जोडेल. यामुळे मुख्य चाकण चौकातील कोंडी कमी होण्यास मदत होईल. याचबरोबर मेदनकरवाडीतील बंगला वस्ती चौक ते रासे फाटा पर्यंतचा २.५ किलोमीटर लांबीचा आणि ३५ मीटर रुंद रस्ता तयार केला जाणार आहे. हा रस्ता पुणे, तळेगाव आणि चाकण टप्पा दोन व तीनला नाशिक महामार्गावरून शिक्रापूर राज्य मार्गावर रासे फाटा येथे जोडतो. तसेच, पश्चिम बाह्यवळण मार्गाअंतर्गत पुणे-नाशिक महामार्गाला चाकण टप्पा पाचला जोडणारा ८५० मीटर लांबीचा रस्ता आणि ४५ मीटर रुंद विकसित केला जाणार आहे. यामुळे चाकण चौक, आंबेठाण चौकातील अवजड वाहतूक जलद होणार आहे.



### चार पर्यायी रस्त्यांमुळे चाकण-तळेगावची कोंडी सुटणार

» चाकण आणि तळेगाव औद्योगिक परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पीएमआरडीएकडून चार पर्यायी बाह्यवळण रस्ते विकसित करण्यात येणार आहेत. पुणे-नाशिक महामार्गाशी औद्योगिक क्षेत्रांना जोडण्यासाठी या रस्त्यांची योजना असून, भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हिंगणे चौक ते खराबवाडी, नाणेकरवाडीतील सॅनी कंपनी ते समृद्धी सीएनजी पंप, मेदनकरवाडीतील बंगला वस्ती चौक ते रासे फाटा आणि चाकण टप्पा पाचला जोडणाऱ्या मार्गांचा यात समावेश आहे. या रस्त्यांमुळे तळेगाव चौक, चाकण चौक आणि आंबेठाण चौकातील अवजड वाहतूक कमी होण्यास मदत होणार आहे. प्रमुख जिल्हा मार्गांच्या सुधारणेचे कामही सुरू असून, आगामी काळात औद्योगिक परिसरातील वाहतूक अधिक वेगवान आणि सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

### प्रमुख जिल्हा मार्गांचा विकास

- » चिखली ते मोई – १.६५ किलोमीटर
- » कुरूळी फाटा ते निघोजे – २.५ किलोमीटर
- » आळंदी फाटा (चाकण) ते आळंदी रस्ता – ४ किलोमीटर
- » चऱ्होली खुर्द ते आळंदी मरकळ – २ किलोमीटर
- » निघोजे ते चाकण एमआयडीसी – १.२५ किलोमीटर
- » खालुंब्रे ते चाकण एमआयडीसी टप्पा दोन – १.७५ किलोमीटर

### शंभर कोटींच्या निधीची तरतूद

» चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला गती देण्यासाठी 'पीएमआरडीए'ने प्रमुख जिल्हा मार्गांच्या विकासाचे काम हाती घेतले आहे. यासाठी १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, ही कामे प्रगतिपथावर आहेत. याचबरोबर चार बाह्यवळण मार्ग प्रस्तावित असून, त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सध्या सुरू आहे. यामुळे भविष्यात औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला गती मिळेल, अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता शिवकुमार कुपल यांनी दिली.

# पुण्यात भाडेकरूंची माहिती न देणाऱ्या 113 घरमालकांविरुद्ध कारवाईचा बडगा

## पुण्यात भाडेकरू आणि पीजीधारकांची माहिती पोलिसांना न देणाऱ्या 113 घरमालकांवर पुणे पोलिसांनी कलम 223 अंतर्गत धडक कारवाई केली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भाडेकरुंची माहिती न देणारे घरमालक, तसेच खासगी वसतिगृह चालकांविरुद्ध (पीजी) पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. भाडेकरुंची माहिती न दिल्या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार कारवाई करण्यात आली आहे. पुणे शहराचा विस्तार वाढत आहे. शहरात अनेक जण नोकरी, व्यवसाय, तसेच शिक्षणासाठी स्थायिक झाले आहे. कायदा आणि सुव्यवस्था, गंभीर स्वरुपांच्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर शहरात वास्तव्यासाठी आलेल्या नागरिकांची माहिती संकलित करणे गरजेचे आहे.



अनेक जण शहरात भाडेतत्त्वावर सदनिका, बैठ्या चाळीतील घरे भाड्याने घेऊन राहत आहेत. परगावाहून शिक्षण, तसेच नोकरीसाठी येणारे अनेक जण खासगी वसतिगृहात (पीजी) राहत आहेत. भाडेतत्त्वावर शहरात राहणाऱ्यांची माहिती घरमालकांनी पोलिसांना कळविणे बंधनकारक आहे. याबाबत पोलिसांनी घरमालकांना आवाहन केले होते. घरमालकांची माहिती न देणाऱ्या कारवाईसाठी विशेष शाखेने मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत स्थानिक पोलीस ठाण्यातील पथके सहभागी झाली आहेत. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहपोलीस आयुक्त संजय दराडे, विशेष शाखेचे उपायुक्त प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.

### पोलिसांचा कारवाईचा बडगा

» पुणे शहरात भाडेतत्त्वावर राहणाऱ्या नागरिकांची माहिती पोलिसांना न देणाऱ्या घरमालक आणि खासगी वसतिगृह चालकांविरुद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. भाडेकरार न करणे किंवा भाडेकरूंची माहिती पोलिसांकडे नोंदवून न देणे, याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार कारवाई करण्यात येत आहे. विशेष शाखेच्या मोहिमेत कोथरूड, डेक्कन, आंबेगाव, नऱ्हे, चतु:श्रृंगी, खडकी, लोणीकंद आणि लोणी काळभोर भागातील १२३ घरमालकांवर कारवाई करण्यात आली. नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणासाठी परगावाहून पुण्यात येणाऱ्या नागरिकांची माहिती पोलिसांकडे असणे कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे घरमालकांनी भाडेकरार करून आवश्यक माहिती ऑनलाइन किंवा संबंधित पोलीस ठाण्यात जमा करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.